# झांबरे विद्यालयात सायबर सुरक्षा सत्र

जळगाव । डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्यासाठी आणि सुरक्षित इंटरनेट वापराची माहिती मिळण्यासाठी ए. टी. झांबरे विद्यालयात इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सुरक्षा जनजागृती' विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात प्रियांदर्शनी भांडारकर व खुशबू लांबोळे यांनी उपस्थित ३०० विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्वाचे धडे दिले.